नियमीत  दिवाणी दावा क ३२/२०१५

<u>निशाणी ८७ वरील आदेश</u>

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नूसार दावा दुरुस्तीसाठी केला आहे.

२ प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या उत्तर—पूर्व कोपऱ्यातील बाजूकडून बंधाऱ्याचे कामकाज चालू केले म्हणून हा दावा दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन बंधाऱ्याचे काम पूर्ण केले आहे असे वादीचे म्हणणे आहे. परिणामी अतिक्रमणाबाबत हुकुमात्मक ताकीद मागण्याकरीता वादीने हा दुरुस्ती अर्ज केला आहे.

३. प्रतिवादी क्र २,४ व ५ यांनी निशाणी ९२ अन्वये अर्जास लेखी हरकत घेतली आहे. प्रस्तावित दुरुस्ती कायदेशीर नाही असा त्यांचा आक्षेप आहे. वादीच्या मागणीवरुन मोजणी झाली असून त्यामध्ये प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याचे नमूद नाही. दावा प्रलंबित असताना कोणतेही अतिक्रमण झालेले नाही. त्यामुळे परिस्थितीमध्ये बदल घडलेला नाही. प्रस्तावित दुरुस्तीने दाव्याचे स्वरुप बदलत आहे. सबब अर्ज नामंजूर करावा असे या प्रतिवादींचे म्हणणे आहे.

४. प्रतिवादी क्र.१व ३ यांनी म्हणणे दिलेले नाही. अर्ज त्यांच्या विरुध्द विना म्हणणे चौकशीस घेतलेला आहे.

५. वादी व प्रतिवादी क्र. २,४ व ५ यांचा युक्तिवाद ऐकला. दावा निरंतर मनाईसाठी दाखल झाला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादींनी दावा मिळकतीत अतिक्रमण केले असे वादीचे म्हणणे आहे. सदरचे अतिक्रमण काढून मिळण्याकरीता वादींना हुकुमात्मक ताकीद मागणे आवश्यक आहे व त्यामुळे हा दुरुस्ती अर्ज केल्याचे

त्यांचे कथन आहे. दुरुस्ती अर्जाचा विचार करताना त्यातील तथ्य तपासणे व त्याबाबत गुणवत्तेवर निष्कर्ष नोंदविणे आवश्यक ठरत नाही. अतिक्रमण झाले किंवा नाही हा अंतिम चौकशीचा भाग राहील. परंतु असे अतिक्रमण काढून मिळण्याबाबतची कथने वादपत्रात समाविष्ट करण्याचे नाकारल्यास वादीचे हक्क डावलले जातील. परिणामी असे हक्क आहेत असे कथन मांडण्यास संधी देणे उचित होईल. तसे हक्क आहेत किंवा नाही हे अंतिम चौकशीत ठरणार आहे. त्यामुळे अशा चौकशीकरीता प्रथम असे कथन दाव्यात असणे गरजेचे आहे. वादीनेच अतिक्रमण केले असल्याचे प्रतिवादींचे कथन सदर चौकशीचा भाग राहील. त्यामुळे या टप्प्यावर अतिक्रमण कोणी केले हे तपासणे आवश्यक नाही. प्रस्तावित दुरुस्ती मुळ वादास अनुसरुन आहे. ती मुळ वाद प्रश्नाच्या अंतिम निराकरणाकरीता योग्य व आवश्यक आहे. त्यामुळे दुरुस्ती मंजूर करणे आवश्यक आहे. सबब मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१ अर्ज निशाणी ८७ खर्च रुपये १०००/— आकारुन मंजूर केला आहे.

२ खर्च रककमेच्या पूर्ततेसह वादीने प्रस्तावित दुरुस्ती विहीत मुदतीत करावी.

०५.०२.२०१८

(रा. अ. सासने )
दिवाणी न्यायाधीश व. स्तर
पंढरपूर

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order is same word to word as per the original order

a) Name of the stenographer A.j.Sure
b) Court : C.J.S.D. Pandharpur
c) order signed by P. O. on : 05/02/2018
d) order uploaded on : 06/02/2018